कोल्हापूर महानगरपालिका
राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM)
एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी.

NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

## राष्ट्रीय आरोग्य अभियान व १५ वित्त आयोग अंतर्गत कंत्राटी पद भरती जाहीरात सन २०२६-२७

कोल्हापूर महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय आरोग्य अभियान व १५ वित्त आयोग अंतर्गत राबविणेत येणा-या विविध कार्यक्रमासाठी कोल्हापूर महानगरपालिका आरोग्य विभाग अंतर्गत खालील तक्त्यामध्ये दर्शविलेप्रमाणे एकत्रीत मानधनावर कंत्राटी रिक्त पदासाठी पात्र उमेदवारांना दर सोमवारी थेट मुलाखतीद्वारे पदभरती पूर्ण होईपर्यंत भरती प्रक्रिया राबविणेत येणार आहे. खालील नमूद केलेली पदे ही कंत्राटी स्वरुपाची असून १५ वित्त आयोग अंतर्गत धोरणानुसार पदाची नियुक्ती ही दिनांक २९ जून २०२६ अखेर राहील. शासनाकडून मुदतवाढीचे आदेश प्राप्त झाले तर पुढील मुदतवाढ देणेत येईल.

| अ.क्र | कार्यक्रम | पद | शैक्षणिक आर्हता | एकत्रीत मानधन | रिक्त पदे | युपीएचसी/पॉलिक्लिनीक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी | | | | |
| १ | राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान | Paediatrician | MD Ped/DCH/DNB | २०००/ भेट मासीक ४ भेटी | ८ | फिरंगाई, पंचगंगा, कसबा बावडा, महाडिक माळ, आयसोलेशन, सदर बाजार, सिध्दार्थ नगर व मोरे माने नगर |
| | | Obstetrics and Gynaecologist | MD/MS Gyn/DGO/DNB | | ७ | फिरंगाई, राजारामपूरी, महाडिक माळ,फुलेवाडी सदर बाजार, सिध्दार्थ नगर व मोरे माने नगर |
| | | पॉलिक्लिनीक विशेषज्ञ | | | | |
| २ | १५ वा वित्त आयोग अंतर्गत पॉलिक्लिनीक | Gynaecologist | MD/MS Gyn/DGO/DNB | २०००/ भेट तसेच प्रती पेशंट तपासणी रु.१०० याप्रमाणे जास्तीत जास्त रु.५००० | १ | फुलेवाडी |
| | | Ophthalmologist | MS Ophthalmologist/DOMS | | १ | फुलेवाडी |
| | | Dermatologist | MD (Skin/VD), DVD, DNB | | ३ | फिरंगाई, राजारामपूरी व मोरे माने नगर |
| | | Psychiatrist | MD Psychiatrist/DPM/DNB | | ५ | फिरंगाई, राजारामपूरी, महाडिक माळ, फुलेवाडी व मोरे माने नगर |
| | | ENT Specialist | MS ENT/DORL/DNB/ | | २ | फुलेवाडी व मोरे माने नगर |

उपरोक्त तक्त्यातील पदाकरीता आरक्षण लागू नाही.

### १५ वित्त आयोगांतर्गत वैद्यकीय अधिकारी

| अ. क्र. | पदाचे नांव | शासन मान्यताप्राप्त संस्थेची शैक्षणिक अर्हता | एकत्रीत मासीक मानधन रु. | एकूण भरावयाची पदे | जातीचा प्रवर्ग व पद संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | एमबीबीएस, एमएमसी कौन्सिलकडील नोंदणी अनिवार्य | ६०००० | ३ | विजा अ-१<br>ईडब्ल्युएस-२ |



Scanned with OKEN Scanner

महत्वाच्या सुचना :-

१. सदर पदे ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही. शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण संबंधी दावा करणेचा अधिकार राहणार नाही.

२. सदर रिक्त पदांच्या संख्येत, शैक्षणिक आर्हता, मानधन, वयोमर्यादा, सामाजिक आरक्षण, नमुद केलेल्या अटी शर्तीमधील बदल करणेचे सर्व अधिकार तसेच कोणतीही पूर्वसुचना न देता भरती प्रक्रिया स्थगित करणे/रद्द करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करणेचे व निकष बदलणेचे किंवा रद्द करणेचे अधिकार हे निवड समिती अध्यक्ष तथा आयुक्त कोल्हापूर महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत.

३. सन २०२६-२७ च्या कृती आराखडयामध्ये सदर पदाची मंजूरी प्राप्त न झाल्यास वरील पदाची सेवा अपोआप संपूष्टात येईल, परंतू वरील पदी सन २०२६-२७ मध्ये मंजूर झालेस पुढील ११ महिने २९ दिवसाची नियुक्ती समाधानकारक कार्यकालानंतर देणेत येईल.

४. नियुक्त करणेत आलेल्या उमेदवारास अटी व शर्ती मान्य असलेबाबतचा करार रु.५००/- चे स्टँम्प पेपरवर लिहून नोटरी करुन द्यावा लागेल. करार पत्राचे अधिन नियुक्ती असेल.

५. या पदासाठी कमाल वयोमर्यादा ७० वर्षे इतकी राहील.

६. शासन सेवेतून सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित नसावी.

७. शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले अधिकारी/कर्मचारी यांना अदा करावयाचा ठोक मानधन मा.सह संचालकसो (अतांत्रिक) राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचे दिनांक १६/१/२०१७ नुसार देय राहील. तसेच पत्रामध्ये नमूद इतर अटी लागू राहतील.

८. बिंदु नामावलीनुसार राखीव प्रवर्गातील उमेदवार पुरेशा प्रमाणात उपलब्ध न झालेस रिक्त पदी प्रतिक्षा यादीतील निवड केलेल्या खुल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांना तात्पुरती नियुक्ती देणेत येईल परंतू मागासवर्गीय उमेदवार प्राप्त झालेस खुल्या प्रवर्गातील झालेल्या उमेदवाराची नियुक्ती संपुष्टात येईल.

९. पात्र उमेदवार यांचेवर कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल झालेचे निदर्शनास आलेस झालेली नियुक्ती रद्द करणेत येईल.

१०. शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले अधिकारी/कर्मचारी यांना जिल्हा शल्य चिकित्सक यांचे शारीरीक व मानसीक दृष्टया सक्षम असलेचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

११. अर्हताधारक उमेदवारांनी खालील विहीत करणेत आलेल्या नमुन्यात लेखी अर्ज करावेत.

१२. पात्र उमेदवारांनी मुलाखतीसाठी स्वखर्चाने निर्धारीत वेळेत उपस्थित रहाणेचे आहे. याकरीता कोणताही प्रवास व इतर कोणताही भत्ता देणेत येणार नाही.

१३. अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांनी जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या अटी पूर्ण करतात याबाबत प्रथम खात्री करुन घ्यावी व त्यानंतरच अर्ज करावेत.

१४. ज्या पदासाठी उमेदवारांना अर्ज करावयाचा आहे त्या पदासाठी जाहिरातीमध्ये दर्शविलेली अर्हता अर्ज करतेवेळी उमेदवारांनी धारण केलेली असणे आवश्यक आहे.

१५. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या प्रत्येक पदाची किमान व कमाल वयोमर्यादा जाहीरात दिनांकास साक्षेप समजण्यात येईल.

१६. अपूर्ण माहितीचे अथवा विहित केलेली अर्हता नसलेल्या उमेदवारांचे अर्ज कोणतेही कारण न देता रद्दबातल ठरविणेत येतील यासाठी उमेदवारास लेखी कळविणेत येणार नाही.

१७. सदर भरती प्रक्रिया पूर्ण झालेनंतर भविष्यात जर एखादया ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस निवड/प्रतिक्षा यादीतील मेरिटमधील पुढील उमेदवारास नवीन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील.

१८. हजर दिनांकापासून किमान ६ महिने सेवा देणे बंधनकारक राहील.



Scanned with OKEN Scanner

अर्ज करण्याची पध्दत :-

१) उमेदवाराने जाहिरातीमध्ये दिलेल्या विहित नमुन्यातच संगणकिकृत अर्ज करावा.

२) उमेदवाराने अर्ज करीत असलेल्या पदाचे नाव व सामाजिक आरक्षणाबाबत अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करावे.

३) इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी विहीत नमुन्यातील अर्ज, मूळ सर्व कागदत्रासह व साक्षांकित प्रतींसह आरसीएच कार्यालय पंचगंगा रुग्णालय इमारत दुसरा मजला शुक्रवार पेठ येथे सकाळी १० ते १२ या वेळेत अर्ज स्वीकारणेत येऊन त्याच दिवशी दुपारी ३ वाजता मुलाखत घेणेत येणार आहे.

४) अर्जासोबत पुढील आवश्यक कागदपत्रांची साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडाव्यात. त्यामध्ये शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र, पदानुसार संबंधीत कौन्सिलकडे रजिस्ट्रेशन केलेले नोंदणी प्रमाणपत्र, जन्म नोंदीचा पुरावा असलेले प्रमाणपत्र, राखीव उमेदवारांचे जातीचे प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, लहान कुटुंबाचे नमूना अ प्रपत्र, पासपोर्ट आकाराचे २ फोटो, शासकीय सेवेतून सेवा निवृत्त झालेले अधिकारी/कर्मचारी यांचे शेवटच्या भोगलेल्या पगाराची स्लीप अथवा कार्यालयाकडील वेतनाचा दाखला.

५) अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, पुर्वानुभव, व इतर आवश्यक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडाव्यात व मुलाखतीच्या वेळी सादर केलेल्या कागदपत्राच्या मुळ प्रतींसह उपस्थित रहाणेचे आहे.

६) पात्रता, अर्जाची स्विकृती किंवा तो नाकारणे, चुकीची माहिती दिल्याबद्दल शिक्षा व निवड पध्दती याबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

उपायुक्त-२
कोल्हापूर महानगरपालिका



Scanned with OKEN Scanner